ग्रामीण परसातील कुक्कुटपालन आणि अनुसूचित क्षेत्र / आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाडयातील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती या प्रकल्पांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करणेबाबत. (लेखाशिर्ष २४०३ डी २३९)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन. ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - १८ सप्टेंबर, २०१७.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. कुक्कुट-२०१७ / प्र. क्र. १३२ / पदुम- ४.

शासन निर्णय :-

राज्यात आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाडयामधील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती करण्याकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता पुरवणी मागणीन्वये मागणी क्र. टी-५ , २४०३, पशुसंवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६-जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (२३) आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाडयामधील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती करण्याकरिता स्वयंम प्रकल्प २४०३ डी २३९, ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. ११००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ४ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार मागणी क्र. टी-५ , २४०३, पशुसंवर्धन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७९६-जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (२३) आदिवासी उपयोजना क्षेत्रामधील अंगणवाडयामधील मुलांच्या आहारामध्ये अंडयांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती करण्याकरिता स्वयंम प्रकल्प, २४०३ डी २३९, ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु. ११००.०० लाख इतक्या अर्थसंकल्पीत रक्कमेच्या ७० %च्या मर्यादेत रु.७७०.०० लाख (अक्षरी रुपये सात कोटी सत्तर लाख फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.३५१/१७/व्यय-२, दि. १३-०७-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१६१५४००८२८२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.09.18 12:02:30 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (पदुम) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.
६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
९. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग